**<u>म.कौ.हिं. संरक्षण अर्ज क्रमांक ६३/२०१८</u>**
**<u>निशाणी क्रमांक २९ खालील आदेश</u>**

(सौ. प्रज्ञा कदम वि. श्री. रामचंद्र कदम वगैरे)

सीएनआर क्र. MHRT030016942018

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने प्रस्तुत प्रकरणातील सामनेवाला क्र.१ याचे विरुध्द रिकव्हरी वॉरंट काढण्याकरिता म्हणून दाखल केलेला आहे. अर्जदारने अर्जात कथन केले की, सामनेवाला क्र.१ याचे विरुध्द अंतरिम पोटगीचे आदेश पारित केलेले आहेत. तरी देखिल सामनेवाला क्र.१ याने अंतरिम पोटगीची रक्कम अर्जदार यांना अदयापपर्यंत अदा केलेली नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याचे विरुध्द रक्कम र.१,०८,०००/– इतक्या रक्कमेकरिता रिकव्हरी वॉरंट काढण्यात यावे अशी विनंती अर्जदार हिने केलेली आहे.

२. प्रस्तुत अर्जावर सामनेवाला यांनी आपले म्हणणे देऊन कथन केले की, सामनेवाला क्र.१ यांना कोविडच्या कालावधीमध्ये रोजगार उपलब्ध नसल्याकारणाने सदर पोटगीची रक्कम देणे बाकी राहिलेली आहे. सामनेवाला यांचे वडील माहे मार्च २०२१ मध्ये निधन पावल्याने सामनेवाला कुटूंबाची आर्थिक परिस्थिती गंभीर झाली आहे. तसेच सामनेवाला क्र.१ याची आई देखिल आजारी असल्याकारणाने पैशाची व्यवस्था करणे सामनेवाला करिता कठीण बनले आहे. त्यामुळे उर्वरित पोटगीची रक्कम सामनेवाला हे थोडी–थोडी अशी भरतील असे त्यांनी कथन केले आहे.

३. दोन्ही पक्षांतर्फे युक्तीवाद ऐकला.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अर्जाचे व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन करता अर्जदार हिला पोटगीकरिता देणे बाकी असलेली रक्कम ही सामनेवाला याला कोविड महामारीच्या पार्श्वभुमीवर रोजगार न मिळाल्यामुळे त्याला आर्थिकदृष्ट्या सदर पोटगीची रक्कम अर्जदार यांना अदा करता आलेली नाही या सामनेवाला याच्या म्हणण्यात तथ्य वाटते. सबब, प्रकरणातील अभिलेख पाहता सामनेवाला याने पोटगीपोटी रु.१०,०००/– अर्जदार हिला दिलेले आहेत. तसेच सामनेवाला याने उर्वरित रक्कम देणेकरिता देखिल नाकारलेले नाही. तथापि, त्याने दिलेले म्हणणे व मागील काही कालावधीतील कोरोना महामारीची पार्श्वभूमी विचारात घेऊन सामनेवाला याला संधी देणे न्यायोचित राहील. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

अर्जदारचा प्रस्तुतचा अर्ज (निशाण क्र.२९) नामंजूर करण्यात येतो.

PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Digitally signed by PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Date: 2021.11.25 17:51:26 +0530

**रत्नागिरी**
**दिनांक–२३/११/२०२१**

**( श्रीम. पी.एस.गोवेकर )**
**५वे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**
**रत्नागिरी.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. M. N. Patil |
| Court Name | : | 5th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Ratnagiri |
| Date of Judgment | : | 23/11/2021 |
| Order Signed by P.O. on | : | 25/11/2021 |
| Order uploaded on | : | 25/11/2021 |